Epaper
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल
MSME - MH-33 -0714843

दैनिक
# जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
मुख्य संपादक: मुकुंदराव शामराव नंन्नवरे

।शनिवार, दि. ८ ऑगस्ट २०२६ । वर्ष १ ।अंक १२१।पाने ४ । Title Code - T/MH/2026/0422/5204/1306 DIGITAL EDITION




» Selected

### शेळावे मंडळात शेतीचे पंचनामे सुरू

**पारोळा| प्रतिनिधी:** पारोळा तालुक्यातील शेळावे मंडळ परिसरात झालेल्या अतिवृष्टीमुळे नुकसानग्रस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या पिकांचे पंचनामे सुरू करण्यात आले आहेत. दहीगाव, मोहाडी, शेळावे, चिखलोद, राजवड, हिरापूर, धाबे आणि दगडी सबगव्हाण या गावांतील शेतकऱ्यांच्या शेतात महसूल विभागाचे अधिकारी प्रत्यक्ष भेट देऊन नुकसानीची नोंद करीत आहेत. मोहाडी येथील ग्राम महसूल अधिकारी (तलाठी) पराग पाटील यांनी नुकसानग्रस्त शेतांमध्ये जाऊन प्रत्यक्ष पाहणी करत पंचनामे केले. त्यामुळे नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून, प्रशासनाने वेळेत कार्यवाही सुरू केल्याबद्दल समाधान व्यक्त करण्यात येत आहे. अतिमुसळधार पावसामुळे शेळावे मंडळातील खेडीढोक, मोहाडी, दहीगाव, शेळावे आणि चिखलोद या गावांतील शेतीपिकांचे मोठ्या प्रमाणावर

## उत्तर महाराष्ट्रातील राजकीय वातावरण ढवळून काढणाऱ्या कथित आक्षेपार्ह ऑडिओ प्रकरणाला नवे वळण

# गिरीश महाजन यांचे निकटवर्तीय विजय चौधरी अटकेत!

## डॉ. हिना गावित यांच्याबाबत कथित अश्लील व जातीवाचक वक्तव्याचा आरोप

जन सम्राट टाईम्स

**नंदुरबार | प्रतिनिधी : उत्तर महाराष्ट्रातील राजकीय वातावरण ढवळून काढणाऱ्या कथित ध्वनीफीत प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. भाजपचे ज्येष्ठ नेते गिरीश महाजन यांचे निकटवर्तीय मानले जाणारे विजय चौधरी यांना नंदुरबार स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने गुरुवारी रात्री ताब्यात घेतले. वैद्यकीय तपासणीनंतर त्यांना अधिकृतपणे अटक करण्यात आली असून, आज शुक्रवारी दुपारी २ वाजता नंदुरबार जिल्हा न्यायालयात हजर करण्यात येणार आहे.**

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक हेमंत पाटील यांच्या पथकाने ही कारवाई केली. चौधरी हे गेल्या काही दिवसांपासून फरार असल्याचे सांगितले जात होते. त्यांना ताब्यात घेतल्यानंतर पुढील कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून नंदुरबार शहर पोलिसांच्या स्वाधीन करण्यात आले.



#### डॉ. हिना गावित यांच्याबाबत कथित आक्षेपार्ह वक्तव्य

सोशल मीडियावर व्हायरल झालेल्या कथित ऑडिओ क्लिपमध्ये भाजपच्या माजी खासदार डॉ. हिना गावित यांच्याबाबत आक्षेपार्ह, अश्लील आणि जातीवाचक स्वरूपाचे वक्तव्य करण्यात आल्याचा आरोप विजय चौधरी यांच्यावर आहे. या प्रकरणी डॉ. हिना गावित यांच्या भावाने नंदुरबार शहर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. त्यानुसार अनुसूचित जाती-जमाती (अत्याचार प्रतिबंधक) कायद्यासह विनयभंग आणि इतर संबंधित कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली.

याशिवाय सामाजिक कार्यकर्त्या मालती वळवी यांनीही स्वतंत्र तक्रार दाखल केली आहे. या तक्रारींमध्ये केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे तसेच आमदार आमश्या पाडवी यांच्याबाबतही कथित आक्षेपार्ह वक्तव्ये करण्यात आल्याचा आरोप आहे. या तक्रारींच्या आधारे विजय चौधरी यांच्याविरोधात आतापर्यंत तीन गुन्हे दाखल झाल्याचे समोर आले आहे.

#### ध्वनीफिती चोरी करून प्रसारित केल्याचाही आरोप

तपासादरम्यान या प्रकरणाला आणखी एक वेगळे वळण मिळाले आहे. विजय चौधरी यांच्या मोबाईलमधील ध्वनीफिती चोरी करून त्या इतर व्यक्तींना विकण्यात आल्या आणि त्यानंतर सोशल मीडियावर प्रसारित करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. यासंदर्भात चौधरी यांच्या मुलाने दिलेल्या फिर्यादीवरून त्यांच्या माजी स्वीय सहाय्यकाविरोधातही गुन्हा दाखल करण्यात आला होता. संबंधित व्यक्तीला पोलिसांनी अटक केली होती. मात्र, चार दिवसांच्या पोलीस कोठडीनंतर न्यायालयाने त्याला जामीन मंजूर केला आहे.

#### न्यायालयाच्या निर्णयाकडे लक्ष

गेल्या काही दिवसांपासून नंदुरबारमध्ये कथित ध्वनीफिती सोशल मीडियावर प्रसारित होत असल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. विजय चौधरी यांच्या अटकेनंतर पोलिसांच्या तपासाला वेग आला असून, कथित ध्वनीफितींची सत्यता, त्यांचा स्रोत आणि या प्रकरणामागील इतर व्यक्तींची भूमिका याबाबत तपासातून काय निष्पन्न होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

#### ऑडिओ क्लिप- सत्यतेवरही प्रश्नचिन्ह

व्हायरल झालेल्या कथित ध्वनीफितींमध्ये गिरीश महाजन, जयकुमार रावल, आमश्या पाडवी, राजेश पाडवी, अमरीश पटेल यांच्यासह विविध राजकीय नेत्यांशी संभाषण असल्याचे दावे सोशल मीडियावर केले जात आहेत. मात्र, संबंधित नेत्यांनी हे आरोप फेटाळून लावले असून, काही कथित ध्वनीफितींमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा वापर करून आवाजात छेडछाड करण्यात आल्याचा दावा केला आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करण्याची मागणीही करण्यात आली आहे. विजय चौधरी यांना न्यायालय त्यांना पोलीस कोठडी देते की न्यायालयीन कोठडी, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे.

# मला राजकीय रणनीतीकाराची आवश्यकता नाही: सुनील तटकरे

## श्रद्धा नगरातील माऊली प्लाझा येथील दोन नळजोडण्यांबाबत नोटीस

जन सम्राट टाईम्स

**मुंबई : । (प्रतिनिधी):** रायगडसारख्या अतिशय संवेदनशील आणि सजग मतदारसंघात गेल्या ४१ वर्षांपासून मी काम करतो आहे. माझ्या प्रदीर्घ राजकीय प्रवासा मी आठ वेळा महाराष्ट्र पालथा घातला आहे. त्यामुळे मतदारसंघांची अतिशय बारीक माहिती मला आहे. आतापर्यंतच्या राजकीय कारकीर्दीत निवडणुकीवेळी सर्व्हे करणे वगैरे हा भाग झाला. परंतु त्यासाठी मला राजकीय रणनीतीकाराची आवश्यकता वाचत नाही, असे स्पष्ट मत राष्ट्रवादीचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे मांडले. भाजपला पराभूत करून संपूर्ण देशात चर्चेत आलेले प्रशांत किशोर यांची राष्ट्रवादी पक्षाचे रणनीतीकार म्हणून नेमल्याचे वृत्त तटकरे यांनी फेटाळून लावले.




राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि राजकीय रणनीतीकार तसेच बिहारमधील नवनिर्वाचित आमदार प्रशांत किशोर यांच्या प्रदीर्घ तीन तासाच्या भेटीनंतर डिझाइन बॉक्सचे सर्वेसर्वा नरेश अरोरा यांची जागा प्रशांत किशोर घेणार असल्याच्या चर्चांना उधाण आले आहे. पार्थ पवार आणि प्रशांत किशोर यांच्यातही राष्ट्रवादीच्या आगामी वाटचालीच्या दृष्टीने चर्चा झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

तसेच या भेटीत तटकरे यांच्या कार्यपद्धतीवर प्रशांत किशोर यांनी काहीसे आक्षेप नोंदवल्याची सूत्रांची माहिती आहे. या सगळ्या वादावर तटकरे यांनी स्पष्टपणे भूमिका मांडली.प्रशांत किशोर आणि सुनेत्रा पवार यांची भेट झाली हे खरे आहे. पण काही भेटी औपचारिक असतात. प्रशांत किशोर आमच्या पक्षासाठी काम करतात हेच मला माहिती नाही. जर प्रशांत किशोर यांना रणनीतीकार म्हणून नेमले असते तर मला माहिती असते. प्रशांत किशोर राजकीय रणनीतीकार म्हणून नेमलेले नाहीत. ज्या अर्थी मला माहिती नाही त्या अर्थी त्यांना पक्षाने नेमले नाही.

# जुन्या वादातून तरुणावर कोयत्यानेजीवघेणाहल्ला

जन सम्राट टाईम्स

**अहिल्यानगर | प्रतिनिधी :** अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड शहरात जुन्या वादातून एका २६ वर्षीय तरुणावर कोयता व वीटाने जीवघेणा हल्ला करून त्याच्या गळ्यातील दीड तोळ्याची सोन्याची साखळी हिसकावून घेतल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी जामखेड पोलीस ठाण्यात तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी आकिब इलाही आत्तार (वय २६, रा. जामखेड) हे २ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी सुमारे ५.३० वाजता खर्डा चौकातील एका चहाच्या दुकानासमोर मोटारसायकलवर बसले होते. त्यावेळी गुड्डू खान (पूर्ण नाव अज्ञात), आमीर तैमुर खान आणि समीर तैमुर खान हे तेथे आले. यावेळी "तू आमच्याकडे रागाने का पाहतोस?" या कारणावरून वाद झाला. त्यानंतर गुड्डू खान याने हातातील नारळ सोलण्याच्या कोयत्याने आकिब आत्तार यांच्या डोक्यावर वार केल्याचा आरोप आहे.

### बोफोर्स प्रकरणावर ४० वर्षांनी अखेर पडदा

**नवी दिल्ली | प्रतिनिधी :** हिंदुजा बंधूंना निर्दोष मुक्त करणाऱ्या दिल्ली उच्च न्यायालयाच्या २००५ मधील निर्णयाविरुद्ध दाखल करण्यात आलेले अंतिम अपील सर्वोच्च न्यायालयाने फेटाळून लावले. यासह, भारतातील अत्यंत गाजलेल्या आणि दीर्घकाळ चाललेल्या भ्रष्टाचार प्रकरणांपैकी एक असलेल्या बोफोर्स घोटाळ्याचा कायदेशीर अध्याय कायमचा बंद झाला.न्यायमूर्ती जे.बी. पारडीवाला आणि न्यायमूर्ती विनोद के. चंद्रन यांच्या खंडपीठाने या प्रकरणातील अंतिम याचिका फेटाळून लावली. या प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने (सीबीआय) यापूर्वी अपील केले होते, परंतु सर्वोच्च न्यायालयाने विलंब झाल्याचे कारण देत २०१८ मध्ये ते फेटाळून लावले होते.

# धुळे जिल्ह्याच्या कन्या डॉ. वैशाली ठाकूर यांची राष्ट्रीय स्तरावर चमक

जन सम्राट टाईम्स

**पुणे / धुळे | प्रतिनिधी :** | धुळे जिल्ह्याच्या कन्या तथा फर्ग्युसन महाविद्यालय (स्वायत्त), पुणे येथील सहाय्यक प्राध्यापक डॉ. वैशाली अरुण ठाकूर यांनी राष्ट्रीय स्तरावरील सौंदर्य व व्यक्तिमत्त्व विकासाच्या क्षेत्रात उल्लेखनीय यश संपादन केले आहे. DIVA Pageants आयोजित 'Mrs. India Empress of the Nation 2026' या राष्ट्रीय स्पर्धेत त्यांनी Platinum Category मध्ये 2nd Runner-Up हा मानाचा किताब पटकावला. याच स्पर्धेत त्यांना 'Beauty with Purpose' हा विशेष पुरस्कार आणि 'Mrs. Intelligent' हा उपकिताबही प्रदान करण्यात आला.



३० जुलै ते २ ऑगस्ट २०२६ या कालावधीत पुण्यात या स्पर्धेची भव्य अंतिम फेरी पार पडली. देशभरातून सहभागी झालेल्या स्पर्धकांमध्ये डॉ. वैशाली ठाकूर यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वासह बौद्धिक क्षमता, आत्मविश्वास आणि सामाजिक जाणिवेची प्रभावी छाप पाडत हे यश मिळवले. DIVA Pageantsच्या संस्थापक अंजना मस्करेन्हास आणि मार्केटिंग डायरेक्टर कार्ल मस्करेन्हास यांच्या मार्गदर्शनाखाली ही राष्ट्रीय स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.

#### अध्यापनासोबत महिला सक्षमीकरणासाठी योगदान

डॉ. वैशाली ठाकूर या केवळ सौंदर्य स्पर्धेतील यशामुळेच नव्हे, तर आपल्या शैक्षणिक व सामाजिक कार्यामुळेही परिचित आहेत. फर्ग्युसन महाविद्यालयात सहाय्यक प्राध्यापक म्हणून कार्यरत असलेल्या डॉ. ठाकूर यांनी अध्यापन, संशोधन आणि महिला सक्षमीकरण या क्षेत्रांत योगदान दिले आहे.


जन सम्राट टाईम्स अँकर न्यूज

# 2600 लोकांना एकाचवेळी कामावरुन काढले


## ATM कार्डवर नाव असलेल्या VISA कंपनीत खळबळ

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी:** ATM कार्डवर नाव असलेल्या VISA कंपनीत मोठी कर्मचारी कपात झाली आहे. भारतासह जगभरातील 2600 लोकांची नोकरी एकाचवेळी गेली आहे. मुंबई, चेन्नई सह भारतातील अनेक शहरांमध्ये कार्यरत असलेल्या VISA कंपनीच्या हजारो कर्मचाऱ्यांनी नोकरी गमावली आहे. कंपनीने पहाटे 4 वाजताच ईमेल पाठवले. झोपेतून उठवल्यावर आलेला मेल पाहून कर्मचारी हादरले. 2026 मध्ये हजारो कर्मचाऱ्यांनी नोकरी गमावली आहे. पहिल्या चार महिन्यांत, गूगल, मेटा, ॲमेझॉन, ओरॅकल, सिस्को इत्यादींसारख्या मोठ्या कंपन्यांनी



हजारो कर्मचाऱ्यांना कामावरून काढून टाकले होते. आता पेमेंट कंपनी व्हिसाचे नावही या यादीत सामील झाले आहे. एटीएम कार्डवर व्हिसा कंपनीचे नाव छापलेले असते. ही कंपनी ATM द्वारे व्यवहार करणाऱ्या डिजीटल सपोर्ट देते. कंपनीने जगभरातील 2600 लोकांना कामावरून काढून टाकले आहे. कंपनीच्या एकूण कर्मचाऱ्यांच्या 7 टक्के आहे. मोठ्या संख्येने भारतीय कर्मचाऱ्यांनाही कामावरून काढून टाकल्याची माहिती समोर आली आहे.भारतीय प्रमाणवेळेनुसार पहाटे 4 वाजता ईमेल येऊ लागले असे व्हिसा कर्मचाऱ्यांकडून सांगण्यात आले. काही दिवसांतच, कामावरून कमी केलेल्या कर्मचाऱ्यांचे प्रवेश रद्द करण्यात आले. बंगळूर, मुंबई, चेन्नई आणि हैदराबाद येथील व्हिसा कार्यालयांमधून कर्मचारी कपातीचे वृत्त समोर येत आहे.एआयमुळे किती भारतीय कर्मचाऱ्यांनी नोकरी गमावली आहे, याबद्दल कोणतीही अधिकृत माहिती उपलब्ध नाही. दरम्यान, एक्स (X) वर मुथुकृष्णन धंदापणी नावाच्या एका युजरने याबाबत पोस्ट केली आहे. व्हिसाने बंगळूरु येथील आपल्या तंत्रज्ञान केंद्रातील अंदाजे 1,400 कर्मचाऱ्यांना कामावरून कमी केले आहे. भारतातील त्यांच्या एकूण कर्मचारी संख्येच्या सुमारे 40 टक्के आहे. व्हिसा कंपनीसाठी भारतात अंदाजे 3,500 कर्मचारी काम करतात. कामावरून कमी केलेल्यांमध्ये अंदाजे 500 इंजिनियर्स आणि 900 इतर कर्मचाऱ्यांचा समावेश असल्याचे समजते.

वंचितांचा, शोषितांचा निर्भीड आवाज
दैनिक जन सम्राट टाईम्स
सत्याचे प्राईम्स
डिजिटल क्रांतीची धगधगती मशाल...
डिजिटल युगात वेगवान, निर्भीड आणि सत्याला प्राधान्य देणारे दैनिक जन सम्राट टाईम्स!
तुम्हालाही पत्रकारितेची आवड आहे का?
समाजातील प्रश्न मांडण्याची जिद्द आहे का?
तुमच्या परिसरातील बातम्या जगापर्यंत पोहोचवायच्या आहेत का?
मग हीच तुमच्यासाठी सुवर्णसंधी!
महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्हा, तालुका आणि गावासाठी वार्ताहर / प्रतिनिधी पाहिजेत
अनुभव असो वा नसो
– उत्साह आणि प्रामाणिकपणा महत्त्वाचा
डिजिटल पत्रकारितेचे प्रशिक्षण व मार्गदर्शन उपलब्ध
तुमच्या आवाजाला मिळेल राज्यभर व्यासपीठ

संपर्क करा (Call / WhatsApp)
+91 93254 87889 / 9270187889
- संपादक -
मुकुंदराव शामराव नंन्नवरे
ईमेल : Jansamrattimes@gmail.com -
वेबसाईट : https://jansamrattimes.in
आजच संपर्क करा...
तुमचा आवाज बना जनतेचा आवाज!

# अनुदानित आश्रमशाळा बोरअंजटी येथे विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन व समुपदेशन कार्यक्रम!

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान; प्रा. सुरेश रामचंद्र वाघ यांचे प्रेरणादायी मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी :** धनाजी नाना चौधरी आदिवासी सेवा मंडळ, सत्रासेन संचलित अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, बोरअंजटी येथे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला चालना देण्यासाठी तसेच सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाच्या उद्देशाने मार्गदर्शन व समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी वार्षिक परीक्षेत उल्लेखनीय यश मिळवलेल्या इयत्ता पहिली ते बारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा माजी प्राचार्य प्रा. सुरेश रामचंद्र वाघ यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रविंद्र रायसिंग भादले होते. उपाध्यक्ष धनंजय रायसिंग भादले आणि सचिव ज्ञानेश्वर रायसिंग भादले यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत शिक्षणासोबत चारित्र्य, शिस्त, संस्कार, परिश्रम आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांचा स्वीकार करण्याचे आवाहन केले. मुख्य मार्गदर्शक प्रा. सुरेश रामचंद्र वाघ यांनी विद्यार्थ्यांना स्वयंअध्ययनाचे महत्त्व, वेळेचे नियोजन, नियमित वाचन, सकारात्मक विचार, आत्मविश्वास, ध्येय निश्चिती, नैतिक मूल्ये आणि शिस्तबद्ध जीवनशैली याविषयी



सविस्तर मार्गदर्शन केले. मोबाईल व सोशल मीडियाच्या अतिवापरापासून दूर राहून पुस्तकांशी मैत्री करण्याचा सल्लाही त्यांनी दिला.

यावेळी त्यांनी स्वामी विवेकानंद, शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या जीवनकार्याची प्रेरणादायी उदाहरणे देत विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा आणि सामाजिक उत्तरदायित्वाची भावना जोपासण्याचे आवाहन केले. विद्यार्थ्यांच्या परीक्षा, करिअर आणि भविष्याबाबतच्या शंकांचे निरसन करून आत्मविश्वासाने पुढे जाण्यासाठी समुपदेशनही करण्यात आले.

कार्यक्रमास माध्यमिक मुख्याध्यापक भगवान भालेराव, डॉ. प्रा. गोपाल पाटील, प्रा. किरण महाजन, प्रा. विजय आखाडे, प्रा. ज्ञानेश्वर पाटील, प्रा. वासुदेव पवार, प्रा. मुकेश पाटील, प्रा. ज्ञानेश्वर पावरा, ज्येष्ठ शिक्षक देवेंद्र पाटील, रेमसिंग पावरा, नेहा भादले, प्राथमिक मुख्याध्यापक जगदीश महाजन, तसेच शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, वसतिगृह कर्मचारी आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्ञानेश्वर पाटील यांनी केले, तर आभार प्रदर्शन डॉ. प्रा. गोपाल पाटील यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व वसतिगृह कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

### विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला चालना

धनाजी नाना चौधरी आदिवासी सेवा मंडळ, सत्रासेन संचलित अनुदानित प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रमशाळा, बोरअंजटी येथे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला चालना देण्यासाठी तसेच सर्वांगीण व्यक्तिमत्त्व विकासाच्या उद्देशाने मार्गदर्शन व समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेबारावीतील गुणवंत विद्यार्थ्यांचा माजी प्राचार्य प्रा. सुरेश रामचंद्र वाघ यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष रविंद्र रायसिंग भादले होते. उपाध्यक्ष धनंजय रायसिंग भादले आणि सचिव ज्ञानेश्वर रायसिंग भादले यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत शिक्षणासोबत चारित्र्य, परिश्रम आणि सामाजिक बांधिलकी या मूल्यांचा स्वीकार करण्याचे आवाहन केले.

शिक्षणासह संस्कारांची जोपासना या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी आवड, आत्मविश्वास, सकारात्मक दृष्टीकोन आणि सामाजिक मूल्यांची जपणूक अधिक दृढ झाली. गुणवंतांचा सन्मान आणि प्रेरणादायी मार्गदर्शनामुळे हा उपक्रम विद्यार्थ्यांसाठी संस्मरणीय ठरला.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज

# मतदारांसाठी दिलासादायक निर्णय

## SIR' उपक्रमास १७ पर्यंत मुदतवाढ



जन सम्राट टाईम्स

**मुंबई । प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (Special Intensive Revision – SIR) २०२६ अभियानांतर्गत मतदारांना मोठा दिलासा देण्यात आला आहे. गणना अर्ज (Enumeration Form) सादर करण्याची मुदत आता १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. यामुळे अद्याप मतदार नोंदणी, दुरुस्ती किंवा गणना अर्ज सादर न केलेल्या पात्र नागरिकांना आपली माहिती वेळेत सादर करण्याची आणखी एक संधी उपलब्ध झाली आहे.

सुधारित वेळापत्रक बीएलओमार्फत गृहभेटी: ३० जून ते १७ ऑगस्ट २०२६ प्रारूप मतदार यादीचे प्रकाशन: २४ ऑगस्ट २०२६ दावे व हरकती स्वीकारण्याचा कालावधी: २४ ऑगस्ट ते २३ सप्टेंबर २०२६ दावे-हरकतींची सुनावणी व निकाल: २४ ऑगस्ट ते २२ ऑक्टोबर २०२६ अंतिम मतदार यादीचे प्रकाशन: २७ ऑक्टोबर २०२६ ऑनलाइन तपासणीची सुविधा मतदारांना आपली माहिती तपासण्यासाठी तसेच अर्ज प्रक्रियेसाठी ऑनलाइन सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. नागरिक ECINET App किंवा भारत निवडणूक आयोगाच्या अधिकृत पोर्टलवरील या सुविधेचा वापर करून मागील SIR मतदार यादीतील आपली नोंद तपासू शकतात. भारत निवडणूक आयोग आणि मुख्य निवडणूक अधिकारी, महाराष्ट्र यांच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या विशेष संक्षिप्त पुनरीक्षण (Special Intensive Revision – SIR) २०२६ अभियानांतर्गत मतदारांना मोठा दिलासा देण्यात आला आहे. गणना अर्ज (Enumeration Form) सादर करण्याची मुदत आता १७ ऑगस्ट २०२६ पर्यंत वाढविण्यात आली आहे. यामुळे अद्याप मतदार नोंदणी, दुरुस्ती किंवा गणना अर्ज सादर न केलेल्या पात्र नागरिकांना आपली माहिती वेळेत सादर करण्याची आणखी एक संधी उपलब्ध झाली आहे. प्रशासनाने सर्व पात्र नागरिकांना मुदतवाढीचा लाभ घेऊन मतदार यादीतील नोंदणी, दुरुस्ती किंवा आवश्यक माहिती वेळेत पूर्ण करण्याचे आवाहन केले आहे.

# हायवे पुलाच्या निकृष्ट कामासाठी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांना जबाबदार धरणे चुकीचे

## पूल बांधकामाबाबत ठेकेदारावर कारवाईची मागणी

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव | प्रतिनिधी:** पाळधी–तरसोद दरम्यान राष्ट्रीय महामार्गावरील पुलाच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीसाठी जळगाव जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे पाणीपुरवठा व स्वच्छता मंत्री गुलाबराव पाटील यांना जबाबदार धरणे चुकीचे असल्याचे मत शिवसेनेचे ज्येष्ठ नेते तथा माजी नगराध्यक्ष पी. एम. पाटील यांनी व्यक्त केले आहे. या संदर्भात त्यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे विरोधकांवर राजकीय हेतूने दिशाभूल करणारे आरोप केल्याचा आरोप केला. पी. एम. पाटील म्हणाले की, गेल्या काही दिवसांत राज्यभर झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. पाळधी–तरसोद परिसरातील पुलाचे नुकसान हे संबंधित ठेकेदाराच्या निकृष्ट दर्जाच्या कामामुळे झाले असून, या कामाबाबत पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनी यापूर्वीच अनेकदा तक्रारी करून कारवाईची मागणी



केली होती. जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीतही हा विषय उपस्थित करण्यात आला होता, असे त्यांनी सांगितले. त्यांच्या म्हणण्यानुसार, असोदा, भादली, तरसोद व पाळधी परिसरातील ग्रामस्थांनीही निकृष्ट कामाबाबत तक्रारी केल्या होत्या. संबंधित ठेकेदाराविरुद्ध कठोर कारवाई करून त्याला काळ्या यादीत (ब्लॅकलिस्ट) टाकावे, परवाना रद्द करावा आणि नव्याने दर्जेदार बांधकाम करावे, अशी मागणी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांनीच केली असल्याचे त्यांनी नमूद केले. पी. एम. पाटील यांनी पुढे सांगितले की, काही दिवसांपूर्वी राज्याचे मंत्री गिरीश महाजन, आमदार सुरेश (राजूमामा) भोळे, आमदार मंगेश चव्हाण आणि खासदार स्मिता वाघ यांनी घटनास्थळी पाहणी करून काम निकृष्ट झाल्याचे स्पष्टपणे सांगितले होते. त्यामुळे केवळ पालकमंत्र्यांना लक्ष्य करणे योग्य नसल्याचे त्यांनी म्हटले. विरोधकांकडून केवळ राजकीय प्रसिद्धीसाठी गुलाबराव पाटील यांची बदनामी करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोप करत त्यांनी जनतेने अशा आरोपांकडे दुर्लक्ष करावे, असे आवाहन केले. पी. एम. पाटील यांनी पालकमंत्री गुलाबराव पाटील यांच्या सामाजिक कार्याचाही उल्लेख केला. गरीबांसाठी आरोग्य सेवा, पंढरपूर वारीसाठी मदत, विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप, दिव्यांगांसाठी सहाय्य, रुग्णवाहिका, अंत्ययात्रा वाहन तसेच विविध विकासकामांमुळे त्यांना जनतेचा विश्वास मिळाल्याचे त्यांनी सांगितले. शेवटी त्यांनी, "गुलाबराव पाटील हे चुकीच्या कामाला कधीही पाठबळ देणार नाहीत. समाजहित आणि विकासाच्या कामांमध्ये ते सातत्याने कार्यरत असून, जळगाव जिल्ह्यातील शिवसैनिक आणि जनतेचा त्यांना कायम पाठिंबा राहील," असा विश्वास व्यक्त केला.

### नशिराबादमधील नागरिकांचा लढा यशस्वी

**नशिराबाद :** नशिराबाद–सुनसगाव–बोदवड मार्गावरील खंडेराव मंदिरासमोरील जिल्हा परिषद प्राथमिक केंद्रशाळेची अत्यंत धोकादायक आणि जीर्ण झालेली इमारत अखेर पाडण्यास सुरुवात झाली आहे. प्रशासनाने उशिरा होईना या गंभीर प्रश्नाची दखल घेतल्यामुळे परिसरातील नागरिक, व्यापारी व पालकांनी मोठे समाधान व्यक्त केले आहे. सततच्या पाठपुराव्यानंतर प्रशासनाला जाग गेल्या अनेक वर्षांपासून ही शाळा इमारत अत्यंत जीर्ण अवस्थेत होती. यासंदर्भात शाळेच्या मुख्याध्यापकांनी वारंवार पाठपुरावा करत गटविकास अधिकारी आणि जिल्हा परिषद प्रशासनाकडे इमारत पाडण्याचे प्रस्ताव सादर केले होते. मात्र, लालफितीच्या कारभारामुळे दीर्घकाळ कोणतीही ठोस कार्यवाही झाली नव्हती, ज्यामुळे नागरिकांमध्ये तीव्र नाराजी होती. अखेर जिल्हा परिषद अध्यक्षांच्या ठराव क्र. ६९० नुसार आणि शिक्षण व क्रीडा समितीच्या शिफारशीवरून या तीन जीर्ण वर्गखोल्या पाडण्यास मंजुरी देण्यात आली होती, परंतु प्रत्यक्ष कारवाईला विलंब होत होता. मोठ्या दुर्घटनेची होती दाट शक्यता शाळा परिसरात दर शुक्रवारी भरणाऱ्या आठवडे बाजारामुळे येथे प्रचंड गर्दी असते.

# नागझिरामध्ये अस्वलीच्या हल्ल्यात वनरक्षकाचा मृत्यू!

## कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेवर गंभीर प्रश्नचिन्ह

जन सम्राट टाईम्स

भंडारा | प्रतिनिधी : नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पांतर्गत नागझिरा ब्लॉकमधील उमरझरी वनपरिक्षेत्राच्या रिसाडा बीटमध्ये कार्यरत असलेले वनरक्षक शामू शरणागत यांचा ५ ऑगस्ट २०२६ रोजी गस्तीदरम्यान अस्वलीच्या हल्ल्यात दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे वन विभागातील अधिकारी, कर्मचारी आणि वनमजुरांमध्ये हळहळ व्यक्त होत असून कर्मचाऱ्यांच्या सुरक्षेच्या उपाययोजनांवर गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. नवीन ब्लॉक रचनेनंतर भेदभावाचा आरोप वनकर्मचाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, एप्रिल २०२६ पासून नवेगाव–नागझिरा व्याघ्र प्रकल्पात नवीन बफर रेंजची रचना करण्यात आली असून नवेगाव आणि नागझिरा असे दोन स्वतंत्र ब्लॉक तयार करण्यात आले आहेत. सध्या नवेगाव ब्लॉकचे उपसंचालक अतुल देवकर तर नागझिरा ब्लॉकचे उपसंचालक प्रीतम सिंग कोडापे आहेत. कर्मचाऱ्यांनी आरोप केला आहे की, दोन्ही ब्लॉकमध्ये वनमजुरांच्या नियुक्तीत मोठी तफावत ठेवण्यात आली आहे. नागझिरा ब्लॉकमधील नागझिरा, उमरझरी, सडक-अर्जुनी, तिरोडा, कोका आणि गडेगाव या सहा रेंजमधील प्रत्येक कॅम्पसाठी केवळ एक वनमजूर नियुक्त करण्यात आला आहे. मात्र, नवेगाव ब्लॉकमध्ये प्रत्येक कॅम्पवर वनरक्षकासोबत दोन वनमजूर कार्यरत आहेत. अपुऱ्या मनुष्यबळामुळे वाढला धोका वनकर्मचाऱ्यांनी सांगितले की, यापूर्वीही नागझिरा बफर क्षेत्रात गस्तीदरम्यान दोन वनमजुरांवर अस्वलाने हल्ला करून त्यांना गंभीर जखमी केले होते. त्या घटनेनंतरही मनुष्यबळ वाढविण्यात आले नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. दुर्गम जंगल परिसरात केवळ एका वनमजुरासह गस्त घालावी लागत असल्याने वनरक्षकांच्या सुरक्षेला मोठा धोका निर्माण होत आहे. अशाच परिस्थितीत गस्तीदरम्यान अस्वलीच्या हल्ल्यात वनरक्षक शामू शरणागत यांचा मृत्यू झाल्याने वन विभागातील सुरक्षा व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. उच्चस्तरीय चौकशीची मागणी या घटनेनंतर वनरक्षक व वनमजूर संघटनांनी संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची, सर्व कॅम्पवर आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध करून देण्याची तसेच वनकर्मचाऱ्यांच्या सुरक्षेसाठी प्रभावी उपाययोजना तातडीने राबविण्याची मागणी केली आहे.

# १३ गुन्ह्यांमधील साडेबारा कोटींचे ९,५३६ किलो अमली पदार्थ नष्ट

## 'नशा मुक्त भारत अभियान' अंतर्गत पुण्यात पर्यावरणपूरक पद्धतीने विल्हेवाट

जन सम्राट टाईम्स

धुळे | प्रतिनिधी: 'नशा मुक्त भारत अभियान' अंतर्गत धुळे जिल्ह्यातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल असलेल्या १३ गुन्ह्यांतील सुमारे १२.५० कोटी रुपयांचा ९,५३६ किलो अमली पदार्थांचा साठा कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करून पर्यावरणपूरक पद्धतीने पुणे येथे नष्ट करण्यात आला. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत ही कारवाई पार पडली.



भारत सरकारच्या 'नशा मुक्त भारत अभियान' अंतर्गत देशाला अमली पदार्थ आणि व्यसनाधीनतेपासून मुक्त करण्यासाठी विविध स्तरांवर विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून धुळे पोलिसांनी जप्त केलेल्या अमली पदार्थांची नियमानुसार विल्हेवाट लावण्यात आली. धुळे पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मुख्यमंत्री यांच्या बेकायदेशीर अमली पदार्थांविरोधातील 'झिरो टॉलरन्स' धोरणानुसार राज्यभर विशेष मोहीम अधिक तीव्र करण्यात आली असून, अमली पदार्थांची तस्करी, साठवणूक आणि विक्री करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई सुरू आहे. पोलीस प्रशासनाने नागरिकांनाही अमली पदार्थांच्या गैरव्यवहाराबाबत माहिती मिळाल्यास तत्काळ पोलिसांना कळविण्याचे आवाहन केले.

## जाहीर नोटीस

तमाम जनतेस, सर्व सहकारी बँका, सहकारी पतसंस्था राष्ट्रीयकृत बँका सरकारी / निमसरकारी / खाजगी वित्तीय संस्था / कंपनी इ. तसेच केशव महेंद्र पुरोहीत, संगीता विजय शर्मा, संदेश विजय शर्मा, राधिका विजय शर्मा व सिताबाई सुरेश शर्मा यांना व त्यांचे कुटूंबातील घटकांना वा जाहीर नोटीसीने कळविण्यात येते कि,

१) जांभोरे येथील शेल गट नं. २६८ एकूण क्षेत्र ०२ हेक्टर २२ आर आकार रूपये ०६०२५ पैसे पैकी ०० हेक्टर ५६ आर + पोट खराब क्षेत्र ०० हेक्टर ३४ आर एकूण क्षेत्र ०० हेक्टर ९० आर ही मिळकत केशव महेंद्र पुरोहीत, संगीता विजय शर्मा, संदेश विजय शर्मा, राधिका विजय शर्मा व सिताबाई सुरेश शर्मा यांचे नांचे मालकीहक्काने आहे.

२) कलम १ मधील सविस्तर नमुद केलेली शेत मिळकत ही वर नमुद लोकांच्या संपूर्ण मालकीच्या वहीवाटीच्या कब्जेउपभोगतील, निर्बंध, निरजोखमी व बोजा विरहीत शेत मिळत आहे. अशी खात्री त्यांनी दिल्यावरून आमचे पक्षकार यांनी केशव महेंद्र पुरोहीत, संगीता विजय शर्मा यांचेशी वर कलम १ मधील नमुद केलेली शेत मिळकत खरेदी करण्याचा सौदा नक्की केलेला आहे. व आमचे पक्षकार हे वर नमुद केलेल्या कलम १ मधील शेत मिळकतीचे लवकरच खरेदीखत लिहून नोंदवुन घेणार आहेत.

३) तथापी केशव महेंद्र पुरोहीत, संगीता विजय शर्मा यांनी वर नमुद कलम १ मधील शेत ही मिळकत ही त्रयस्थ इसम अक्रमखान धरणगांव यांचे मार्फत दुसऱ्यास विक्री करण्याचा प्रयत् चालविलेला आहे. सदरची बाब ही आमच्या पक्षकारास समजल्यानंतर आमचे पक्षकाराने केशव महेंद्र पुरोहीत संगीता विजय शर्मा यांग वकीलामार्फत रोटीस पाठविली. तसेच वर नमुद कलम १ मधील मिळकत ही त्यांनी स्वतः अथवा मुखत्वारामार्फत दुसऱ्या कोणालाही विक्री अथवा अन्य कुठल्याही या हस्तांतर करू नये म्हणुन धरणगांव येथील दिवाणी न्यायालयात दिवाणी दावा नं. ३३ / २०२६ चा मनाई हुकुमाचा दावा दाखल केलेला आहे.

अशा परिस्थीतीत वर नमूद कलम १ मधील शेत मिळकतीचा केशव महेंद्र पुरोहीत, संगीता विजय शर्मा यांनी स्वतः अथवा मुखत्यारामार्फत कुठलाही तिन्हाईत इसमाशी व्यवहार केल्यास तो व्यवहार हा आमच्या पक्षकारावर बंधनकारक राहणार नाही. म्हणून सदरची सावधानतेची जाहीर नोटीस दिली असे.

सदाची जाहीर नोटीस आमचे पक्षांनी दिलेल्या धरून माहीतीवरून सुचनांवरून व दाखविलेल्या कागदपशंवरून आमचे मार्फत अशिलांचे खर्चाने प्रसिध्दीस दिली असे.

ठिकाण:- धरणगांव
दिनांक : ०७/०८/२०२६

अँड. राजेंद्र ए. येवले
जैन गल्ली धरणगाव
मोबा. नं. ९३२६०-५९६१८

# एक वाढदिवस... दोन वृक्ष' उपक्रमाने सत्रासेन आश्रम शाळेचा हरित संकल्प

## गांधी रिसर्च फाउंडेशनच्या सहकार्याने वृक्षारोपण; प्रत्येक वाढदिवशी वृक्ष लावण्याचा निर्धार

जन सम्राट टाईम्स

**चोपडा | प्रतिनिधी :** "झाडे लावा, झाडे जगवा; निसर्गाशी नाते जपा" या संदेशाला कृतीची जोड देत धनाजी नाना प्राथमिक तसेच डी.आर.बी. माध्यमिक व उच्च माध्यमिक आश्रम शाळा, सत्रासेन येथे गांधी रिसर्च फाउंडेशन, जळगाव यांच्या सहकार्याने वृक्षारोपणाचा प्रेरणादायी उपक्रम उत्साहात पार पडला. यावेळी "एक वाढदिवस... दोन वृक्ष" हा अभिनव संकल्प स्वीकारत प्रत्येक शिक्षकाने वाढदिवसानिमित्त दोन वृक्ष लावून त्यांचे संगोपन करण्याचा निर्णय घेतला.



कार्यक्रमाची सुरुवात "वृक्षवल्ली आम्हा सोयरे वनचरे" या संत तुकाराम महाराजांच्या अभंगातील संदेशाने करण्यात आली. यापूर्वी संस्थेचे अध्यक्ष रवींद्र रायसिंग भादले यांनी स्वखर्चातून उपलब्ध करून दिलेल्या १०० वृक्षांची लागवड करण्यात आली होती. त्या हरित अभियानाला पुढे नेत गांधी रिसर्च फाउंडेशनने उपलब्ध करून दिलेल्या वृक्षांमुळे पर्यावरण संवर्धनाच्या उपक्रमाला नवी ऊर्जा मिळाली. यावेळी गांधी रिसर्च फाउंडेशनचे प्रतिनिधी चंद्रकांत चौधरी प्रमुख उपस्थित होते. संस्थेचे सचिव ज्ञानेश्वर रायसिंग भादले यांच्या हस्ते वृक्षारोपण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. वाढदिवसानिमित्त योगेश ईश्वरलाल पाटील आणि विकास रामदास पाटील यांनी प्रत्येकी दोन वृक्ष लावून त्यांच्या संगोपनाची जबाबदारी स्वीकारली. विद्यार्थ्यांनीही या उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेत पर्यावरण संरक्षणाची सामूहिक शपथ घेतली. मान्यवरांनी मार्गदर्शन करताना महात्मा गांधी यांच्या ग्रामस्वच्छता, पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाच्या विचारांचे महत्त्व अधोरेखित केले. कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन भालचंद्र शिवाजी पवार यांनी केले. या उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे अध्यक्ष रवींद्र रायसिंग भादले, सचिव ज्ञानेश्वर रायसिंग भादले, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक डी. पी. पावरा, माध्यमिक विभागाच्या मुख्याध्यापिका वंदना सरदार पावरा यांच्या मार्गदर्शनाखाली शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि वस्तीगृह विभागातील कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमास विद्यार्थी, शिक्षक व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. "आजचे एक रोपटे म्हणजे उद्याच्या पिढीसाठी प्राणवायूचा अमूल्य ठेवा" हा संदेश देत पर्यावरण संवर्धनाची सामूहिक जबाबदारी स्वीकारण्याचे आवाहन करण्यात आले.

Printed, published and Owned by Mukundrao Shamrao Nannaware, and printed at Shri Samarth Krupa Digital Printers, Plot No. 16. S.R. No.39/1 Sadguru Nagar, MIDC Jalgaon-425001 and published at 2nd FLOOR, BALAJI SANKUL, NEAR KHAJAMIYA CHOUK, JALGAON (MS.) PIN - 425001, Editor - Mukundrao Shamrao Nannaware Title Code - T/MH/2026/0422/5204/1306

# सणासुदीच्या काळात साखरेनं दिला दराचा चटका

## महिनाभरातच तब्बल 15 टक्क्यांची वाढ, दर वाढण्याचं नेमकं कारण काय?

जन सम्राट टाईम्स

**नवी दिल्ली | प्रतिनिधी:** आगामी सणासुदीच्या काळात महागाईचा फटका सर्वसामान्यांच्या खिशाला बसणार आहे. सरकारच्या प्रयत्नांनंतरही, देशांतर्गत बाजारात साखरेच्या किमती सातत्याने वाढत आहेत. गेल्या महिन्याच्या आकडेवारीनुसार, साखरेच्या किमती सरासरी 8 टक्क्यांनी वाढल्या आहेत, तर काही राज्यांमध्ये ही वाढ 15 टक्क्यांपर्यंत पोहोचली आहे. यामुळे दिवाळी, दसरा आणि इतर सणांमध्ये मिठाई जनतेसाठी महाग ठरू शकते, अशी चिंता निर्माण झाली आहे. सणासुदीच्या काळात साखरेचा खप सर्वाधिक असतो, पण ही तीव्र भाववाढ घरगुती बजेट विस्कळीत करण्याची शक्यता निर्माण करत आहे. वाढत्या किमतींना आळा घालण्यासाठी साखर कारखान्यांनी आता एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. गेल्या महिन्याभरात घाऊक बाजारात साखरेच्या किमती प्रति क्विंटल 400 रुपयांपर्यंत वाढल्या आहेत. या बिघडत चाललेल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर, बाजारात ताज्या साखरेचा पुरवठा शक्य तितक्या लवकर वाढवण्यासाठी साखर कारखान्यांनी यावर्षी साखर गाळप प्रक्रिया 10 ते 15 दिवस आधी सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. साखरेचे दर अचानक वाढण्यामागे उत्पादनात झालेली घट हे सर्वात मोठे कारण आहे.

यावर्षी देशात 293 लाख टन साखरेचे उत्पादन होईल, असा प्राथमिक अंदाज होता, मात्र प्रत्यक्षात हा आकडा केवळ 280 लाख टनांवर आला. हे निश्चित अंदाजापेक्षा सुमारे 5 टक्के कमी आहे. मात्र, दिलासा देणारी बाब म्हणजे गेल्या वर्षीचा सुमारे 50 लाख टनांचा साठा अजूनही उपलब्ध आहे. पण आव्हान हे आहे की, देशातील एकूण साखरेचा



वार्षिक वापर 280 लाख टन इतका असून, यावर्षी 8 लाख टन साखर निर्यातही झाली आहे. याशिवाय एल निनोचा प्रभाव आणि पुढील वर्षी उत्पादनात घट होण्याची भीती यामुळे बाजारात घबराट निर्माण झाली असून त्यामुळे दर आणखी वाढले आहेत.सरकारी आकडेवारीनुसार, देशातील जवळपास प्रत्येक प्रमुख शहरात साखरेच्या किरकोळ दरात मोठी वाढ झाली आहे. राजधानी दिल्लीत, जी साखर महिन्याभरापूर्वी 45 रुपये प्रति किलो दराने विकली जात होती, ती आता 49 रुपयांवर पोहोचली आहे. याचा परिणाम विशेषतः पश्चिम बंगालमध्ये अधिक जाणवत आहे, जिथे जी साखर 49 रुपये प्रति किलो दराने विकली जात होती, ती आता 55 रुपये प्रति किलो दराने विकली जात आहे. त्याचप्रमाणे, चेन्नईमध्ये दर 46 रुपयांवरून 53 रुपयांपर्यंत, मुंबईत 46 रुपयांवरून 52 रुपयांपर्यंत आणि झारखंडची राजधानी रांचीमध्ये 47 रुपयांवरून 51 रुपयांपर्यंत वाढले आहेत.साखरेचे भाव जास्त राहिल्यास, साखर कारखान्यांना उसाच्या रसापासून इथेनॉल तयार करण्याऐवजी साखर उत्पादन करून तिची थेट विक्री करणे अधिक फायदेशीर ठरेल. याचा परिणाम देशातील इथेनॉल उत्पादनावर होऊ शकतो. सरकारने सध्या साठ्यावर मर्यादा घालून आणि कारखान्यांमधील साठ्यावर देखरेख ठेवून किमती नियंत्रित करण्याचा प्रयत्न केला आहे, परंतु किरकोळ बाजारावरील त्याचा परिणाम अजून दिसून आलेला नाही.

### महानगरांमधील साखरेचे नवीन दर

देशातील जवळपास प्रत्येक प्रमुख शहरात साखरेच्या किरकोळ दरात मोठी वाढ झाली आहे. राजधानी दिल्लीत, जी साखर महिन्याभरापूर्वी 45 रुपये प्रति किलो दराने विकली जात होती, ती आता 49 रुपयांवर पोहोचली आहे. याचा परिणाम विशेषतः पश्चिम बंगालमध्ये अधिक जाणवत आहे, जिथे जी साखर 49 रुपये प्रति किलो दराने विकली जात होती, ती आता 55 रुपये प्रति किलो दराने विकली जात आहे.

# मुंबई मध्य RTO मध्ये दुचाकींसाठी 'MH 01 FL'नवीन मालिका सुरू!

जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** प्रादेशिक परिवहन कार्यालय (मुंबई मध्य) येथे दुचाकी खाजगी वाहनांसाठी 'MH 01 FL' ही नवीन नोंदणी मालिका लवकरच सुरू करण्यात येणार आहे. सध्या वापरात असलेली 'MH 01 FK' मालिका संपत आल्याने ही नवीन मालिका लागू करण्यात येत असून, वाहनधारकांना पसंतीचा नोंदणी क्रमांक आगाऊ शुल्क भरून आरक्षित करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. १० ऑगस्टपर्यंत अर्जाची मुदत महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ मधील सुधारित नियम ५४ (अ) नुसार वाहनधारकांना पसंतीचा क्रमांक आरक्षित करता येणार आहे. अर्ज करण्याची अंतिम मुदत: १० ऑगस्ट २०२६, दुपारी १२.०० वाजेपर्यंत अर्ज स्वीकारण्याचे ठिकाण: RTO मुंबई (मध्य) कार्यालय, खिडकी क्रमांक E-11 संपर्क अधिकारी: श्री. ऑल्विन पॉल विहित नमुन्यात अर्ज करून आवश्यक शुल्क भरल्यानंतर क्रमांक आरक्षणाची पावती दिली जाईल. एकाच क्रमांकासाठी अनेक अर्ज आल्यास लिलाव एखाद्या पसंतीच्या क्रमांकासाठी एकापेक्षा अधिक अर्ज प्राप्त झाल्यास १० ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २.०० वाजता लिलावपद्धतीने संबंधित क्रमांक वाटप करण्यात येईल. आवश्यक कागदपत्रे फोटो असलेले ओळखपत्र निवासाचा पुरावा पॅन कार्ड वाहन खरेदीची पावतीमहत्त्वाच्या अटी आरक्षण शुल्क "प्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (मध्य)" यांच्या नावे डिमांड ड्राफ्ट (DD) द्वारे भरावे लागेल. आरक्षित नोंदणी क्रमांकाची १८० दिवसांपर्यंत वैधता राहील. या कालावधीत संबंधित वाहनाची नोंदणी करणे आवश्यक असेल. 'वाहन-04' प्रणालीमध्ये आरक्षणाची नोंद झाल्यानंतरच संबंधित क्रमांक अधिकृतपणे वाहनास देण्यात येईल. नवीन दुचाकी खरेदी करणाऱ्या वाहनधारकांनी या सुविधेचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, मुंबई (मध्य) यांनी केले आहे.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचाराच्या प्रयत्नाचा संशय

## रुग्णालयाबाहेरपोलिसांचाकडकबंदोबस्त




जन सम्राट टाईम्स

**मुंबई | प्रतिनिधी :** भंडारा शहरातील आंबेडकर वॉर्ड परिसरात गुरुवारी दुपारी घडलेल्या धक्कादायक घटनेमुळे संपूर्ण शहरात संतापाचे वातावरण निर्माण झाले आहे. साडेतीन वर्षांच्या बालिकेवर एका ३० वर्षीय युवकाने लैंगिक अत्याचाराचा प्रयत्न केल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असून, पोलिसांनी संशयिताला ताब्यात घेतले आहे.
प्राथमिक माहितीनुसार, घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने कारवाई करत संशयिताला ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून, प्रकरणाचा सखोल तपास केला जात आहे. दरम्यान, पोलिसांच्या ताब्यात असताना संशयिताने स्वतःला दुखापत करून घेतल्याची माहिती समोर आली.
त्यानंतर त्याला उपचारासाठी जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक तपासात संशयित मानसिकदृष्ट्या अस्वस्थ असल्याचा संशय व्यक्त करण्यात आला असला, तरी याबाबतचा अंतिम निष्कर्ष वैद्यकीय तपासणी आणि तपास पूर्ण झाल्यानंतरच स्पष्ट होईल, असे पोलिसांनी सांगितले आहे. पीडित बालिकेची वैद्यकीय तपासणी करण्यात येत असून, घटनास्थळाचा पंचनामा करून आवश्यक पुरावे जप्त करण्यात आले आहेत. रुग्णालयाबाहेर तणावपूर्ण वातावरण संशयितावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू असल्याची माहिती मिळताच सायंकाळी मोठ्या संख्येने नागरिक रुग्णालयाबाहेर जमले. "आरोपीला आमच्या ताब्यात द्या" अशा घोषणा देत संतप्त नागरिकांनी निषेध व्यक्त केला. प्राथमिक माहितीनुसार, घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने कारवाई करत संशयिताला ताब्यात घेतले. त्याच्याविरुद्ध गुन्हा नोंदविण्याची प्रक्रिया सुरू असून, प्रकरणाचा सखोल तपास केला जात आहे. दरम्यान, पोलिसांच्या ताब्यात असताना संशयिताने स्वतःला दुखापत करून घेतल्याची माहिती समोर आली. परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला आणि रुग्णालय परिसरात कडक सुरक्षा व्यवस्था लागू केली. जलद व निष्पक्ष तपासाची मागणी या घटनेमुळे बालकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. प्रकरणाचा जलदगतीने व निष्पक्ष तपास करून दोषी आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# संसदेत 'सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास (संशोधन) विधेयक २०२६' मंजूर

## ९० दिवसांत वाद निवारण आणि डिजिटल नोंदणीला प्रोत्साहन

जन सम्राट टाईम्स



**नशिराबाद । प्रतिनिधी:** देशातील सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग (MSME) क्षेत्राला अधिक सक्षम, स्पर्धात्मक आणि आर्थिकदृष्ट्या बळकट करण्याच्या उद्देशाने 'सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योग विकास (संशोधन) विधेयक, २०२६' संसदेत मंजूर करण्यात आले आहे. या विधेयकामुळे एमएसएमई उद्योजकांना थकीत देयके, वाद निवारण आणि नोंदणी प्रक्रियेत मोठा दिलासा मिळणार आहे. थकीत देयकांच्या समस्येवर प्रभावी उपाय एमएसएमई उद्योगांना वेळेत देयके मिळावीत यासाठी प्रत्येक केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमाने (CPSE) वस्तू किंवा सेवांच्या खरेदीची सर्व देयके 'ट्रेड रिसीवेबल्स डिस्काउंटिंग सिस्टम' (TReDS) या इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्मद्वारे करणे बंधनकारक करण्यात आले आहे. यामुळे देयकांचा विलंब कमी होऊन उद्योगांचा रोख प्रवाह (Cash Flow) सुधारण्यास मदत होणार आहे. ९० दिवसांत वाद निवारण वाद अथवा मध्यस्थी निष्फळ ठरल्यास संबंधित प्रकरण ३० दिवसांच्या आत लवादाकडे (Arbitration) पाठविणे बंधनकारक असेल. तसेच सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर ९० दिवसांच्या आत अंतिम निर्णय देण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यामुळे उद्योगांच्या न्यायप्रक्रियेला गती मिळणार आहे.थकीत देयकांच्या समस्येवर प्रभावी उपाय एमएसएमई उद्योगांना वेळेत देयके मिळावीत यासाठी प्रत्येक केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमाने (CPSE) वस्तू किंवा सेवांच्या खरेदीची सर्व देयके 'ट्रेड रिसीवेबल्स डिस्काउंटिंग सिस्टम' (TReDS) या इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्मद्वारे करणे बंधनकारक करण्यात आले आहे. प्रलंबित प्रकरणांतील उद्योजकांना दिलासा जर एखादे प्रकरण सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ प्रलंबित राहिले, तर निश्चित अथवा ठरलेल्या रकमेपैकी किमान ५० टक्के रक्कम पुरवठादाराला देणे बंधनकारक करण्यात आले आहे. या निर्णयामुळे लघू उद्योजकांवरील आर्थिक ताण कमी होण्याची अपेक्षा आहे. डिजिटल नोंदणीची सुविधा एमएसएमई उद्योगांच्या नोंदणीसाठी मोफत आणि स्वैच्छिक राष्ट्रीय डिजिटल प्लॅटफॉर्म विकसित करण्याची तरतूदही या विधेयकात करण्यात आली आहे. यामुळे उद्योग नोंदणी प्रक्रिया अधिक सुलभ, पारदर्शक आणि वेगवान होणार असून 'ईज ऑफ डुइंग बिझनेस'ला चालना मिळेल. देशातील लाखो सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना आर्थिक स्थैर्य, जलद न्याय आणि सुलभ प्रशासकीय प्रक्रिया उपलब्ध होण्याची अपेक्षा व्यक्त केली.

# जनसामान्य सक्षमीकरणासाठी भुसावळ येथे 'जनसमाधान बैठक 'संपन्न

## QR कोडद्वारे अर्जांचा ऑनलाइन मागोवा घेण्याची सुविधा

जन सम्राट टाईम्स



**भुसावळ। (प्रतिनिधी):** नागरिकांच्या दैनंदिन तक्रारी, प्रशासकीय प्रश्न आणि विविध अडीअडचणींचे स्थानिक स्तरावर जलद व कालबद्ध निवारण करण्याच्या उद्देशाने जळगाव जिल्हाधिकारी यांच्या संकल्पनेतून उपविभाग स्तरावर राबविण्यात येणारी 'जनसमाधान बैठक' भुसावळ येथे उत्साहात पार पडली. या लोकाभिमुख उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी यांनी उपविभागीय कार्यालयात उपस्थित राहून नागरिकांशी थेट संवाद साधला. विविध विभागांशी संबंधित तक्रारी, मागण्या आणि अर्ज स्वीकारून संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या. स्थानिक स्तरावरच तक्रारींचे निवारण या उपक्रमामुळे नागरिकांना आपल्या समस्यांसाठी जिल्हा मुख्यालयात जाण्याची आवश्यकता राहत नसून, उपविभागीय स्तरावरच प्रशासनाशी थेट संवाद साधून प्रश्न मांडण्याची आणि त्यावर जलद कार्यवाही होण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. डिजिटल पारदर्शकतेवर भर बैठकीत प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जाचे तात्काळ स्कॅनिंग करून 'जनसमाधान पोर्टल' वर नोंद करण्यात येत आहे. प्रत्येक अर्जाला स्वतंत्र QR Code देण्यात येत असून, त्याद्वारे नागरिकांना आपल्या अर्जाची सद्यस्थिती ऑनलाइन पाहण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे. त्यामुळे तक्रार निवारण प्रक्रियेत पारदर्शकता आणि उत्तरदायित्व वाढण्यास मदत होत आहे. जिल्हा प्रशासनाच्या या अभिनव उपक्रमामुळे नागरिकांच्या तक्रारींचे प्रभावी, पारदर्शक आणि वेळेत निवारण होण्यास चालना मिळत असून, प्रशासन अधिक लोकाभिमुख करण्याच्या दिशेने हे महत्त्वाचे पाऊल मानले जात आहे.

### नागरिकांशी थेट साधला संवाद

नागरिकांच्या दैनंदिन तक्रारी, प्रशासकीय प्रश्न आणि विविध अडीअडचणींचे स्थानिक स्तरावर जलद व कालबद्ध निवारण करण्याच्या उद्देशाने जळगाव जिल्हाधिकारी यांच्या संकल्पनेतून उपविभाग स्तरावर राबविण्यात येणारी 'जनसमाधान बैठक' भुसावळ येथे उत्साहात पार पडली. या लोकाभिमुख उपक्रमांतर्गत जिल्हाधिकारी यांनी उपविभागीय कार्यालयात उपस्थित राहून नागरिकांशी थेट संवाद साधला. आपल्या समस्यांसाठी जिल्हा मुख्यालयात जाण्याची आवश्यकता राहत नसून, उपविभागीय स्तरावरच प्रशासनाशी थेट संवाद साधून प्रश्न मांडण्याची आणि त्यावर जलद कार्यवाही होण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

# कासारखेडा शिवारातून ८५ हजारांची वीज तार चोरी

## महावितरणचे ३,९०७ मीटर ॲल्युमिनिअम कंडक्टर लांबवले

जन सम्राट टाईम्स

**यावल । प्रतिनिधी:** यावल तालुक्यातील कासारखेडा मोटकरी शिवारातून अज्ञात चोरट्यांनी महावितरण कंपनीची सुमारे ३,९०७ मीटर लांबीची ॲल्युमिनिअम वीज तार चोरी करून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. या चोरीमुळे महावितरणचे सुमारे ८५ हजार रुपयांचे नुकसान झाले असून, याप्रकरणी यावल पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.महावितरणचे प्रधान तंत्रज्ञ मनोहर बन्सीलाल सोनवणे (रा. चोपडा) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, ५ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६.३० ते ६ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजेदरम्यान ही चोरी झाली. चोरट्यांनी कासारखेडा ग्रुप-०४ आणि कासारखेडा ग्रुप-०१अंतर्गत येणाऱ्या शेतशिवारातील एकूण २२ गाळ्यांमधील ॲल्युमिनिअम कंडक्टर चोरून नेला. २२ गाळ्यांमधील तार चोरी ग्रुप-०४ अंतर्गत ग्रामपंचायत कासारखेडा मोटकरी येथील गट क्रमांक ५५ पासून देविदास पंडित झांबरे (गट क्र. ५३) आणि युवराज चंद्रकांत चौधरी (गट क्र. ५७) यांच्या शेतापर्यंतच्या १२ गाळ्यांतील, तर ग्रुप-०१ अंतर्गत गट क्रमांक ५७ ते गट क्रमांक ५६ पर्यंतच्या १० गाळ्यांतील वीज तारा चोरट्यांनी लंपास केल्या. महावितरणचे कर्मचारी हेमराज उमाकांत पाटील आणि हेमंत चंद्रशेखर पाटील यांनी माहिती दिल्यानंतर घटनास्थळी पाहणी केली असता, एकूण ३,९०७ मीटर लांबीची वीज तार गायब असल्याचे निदर्शनास आले. भारतीय विद्युत अधिनियमांतर्गत गुन्हा या प्रकरणी मनोहर सोनवणे यांच्या फिर्यादीवरून यावल पोलीस ठाण्यात भारतीय विद्युत अधिनियम (सुधारणा) २००३ च्या कलम १३६ अन्वये अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला .

# विशेष मतदार पुनरीक्षण अभियान यशस्वी पूर्ण!



जन सम्राट टाईम्स

**जळगाव | प्रतिनिधी:** तालुक्यातील नंदगाव येथे भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात आलेल्या विशेष मतदार पुनरीक्षण (SIR) अभियानात मतदान यादी अद्ययावत करण्याचे काम नियोजनबद्ध, जबाबदारीने आणि अल्पावधीत यशस्वीरित्या पूर्ण करणारे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बी.एल.ओ.) मुकेश पाटील यांचा नानाश्री फाऊंडेशनतर्फे विशेष सत्कार करण्यात आला. लोकशाहीची खरी ताकद अचूक व पारदर्शक मतदार यादीत असल्याचे अधोरेखित करत, मतदार नोंदणी, दुरुस्ती, वगळणी तसेच इतर प्रक्रियांचे काटेकोरपणे पालन करत एन्युमरेशन फॉर्मचे १०० टक्के डिजिटायझेशन वेळेत पूर्ण केल्याबद्दल त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला. यावेळी बी.एल.ओ. मुकेश पाटील यांना शाल, पुष्पगुच्छ आणि प्रेरणादायी पुस्तक देऊन सन्मानित करण्यात आले.कार्यक्रमात बोलताना नानाश्री फाऊंडेशनचे अध्यक्ष स्वप्निल सोनवणे यांनी सांगितले की, समाजासाठी प्रामाणिकपणे आणि निःस्वार्थ भावनेने कार्य करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांचा सन्मान होणे आवश्यक आहे. तालुक्यातील नंदगाव येथे भारतीय निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार राबविण्यात आलेल्या विशेष मतदार पुनरीक्षण (SIR) अभियानात मतदान यादी अद्ययावत करण्याचे काम नियोजनबद्ध, जबाबदारीने आणि अल्पावधीत यशस्वीरित्या पूर्ण करणारे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बी.एल.ओ.) मुकेश पाटील यांचा नानाश्री फाऊंडेशनतर्फे विशेष सत्कार करण्यात आला. पारंपरिक सत्कारासोबत प्रेरणादायी पुस्तक भेट देण्यामागचा उद्देश समाजात ज्ञानाचा आणि सकारात्मकतेचा संदेश पोहोचविणे हा आहे. या प्रसंगी उपस्थित तरुणांनी बी.एल.ओ. मुकेश पाटील यांच्या कार्याचे कौतुक करत भविष्यातही अशाच निष्ठेने जनसेवा करण्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाला मुख्याध्यापिका रागिणी सोनवणे, शिक्षिका कामिनी चव्हाण, आक्काबाई पाटील, मिनाक्षी पाटील, नानाश्री फाऊंडेशनचे स्वप्निल सोनवणे, मयुर सोनवणे, राकेश धनगर, आनंदा सोनवणे, विजय कोळी, भावेश सोनवणे, आबा कोळी, दुर्गेश सोनवणे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चाळीसगाव रोड पोलिसांची कामगिरी; मोटारसायकल चोरीचा गुन्हा उघड

## गोपनीय माहितीच्या आधारे कारवाई; ३० हजारांची चोरीची मोटारसायकल हस्तगत

जन सम्राट टाईम्स



**धुळे | प्रतिनिधी :** धुळे शहरातील महामार्ग क्रमांक ३ वरील लकबँक हॉटेलसमोरून चोरीस गेलेली मोटारसायकल अवघ्या काही दिवसांत शोधून काढत चाळीसगाव रोड पोलिसांनी चोरीचा गुन्हा उघडकीस आणला आहे. या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून सुमारे ३० हजार रुपये किमतीची मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मजीद मुसा शाह (रा. ऐशीफुटी रोड, नुरानी मशिदजवळ, धुळे) यांनी त्यांची होंडा युनिकॉर्न (क्र. MH-18/ SB-1525) ही मोटारसायकल ३० जुलैच्या मध्यरात्री ते ३१ जुलैच्या पहाटे दरम्यान अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची तक्रार दाखल केली होती. त्यानुसार चाळीसगाव रोड पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक २२४/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (BNS) कलम ३०३(२) अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला होता. तपासादरम्यान ७ ऑगस्ट २०२६ रोजी प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक विवेक पवार यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी शंभर फुटी रोडवरील डी-मार्ट परिसरात सापळा रचून नूर मोहम्मद इस्तेयाक अहमद अन्सारी याला ताब्यात घेतले. चौकशीत त्याने मोटारसायकल चोरीची कबुली दिल्यानंतर चोरीची मोटारसायकल जप्त करण्यात आली. या कारवाईमुळे मोटारसायकल चोरीचा गुन्हा उघडकीस आला असून आरोपीला न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याची माहिती पोलिसांनी दिली. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक अजय देवरे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी राजकुमार उपासे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि. विवेक पवार, पोउनि. संदीप काळे तसेच पोलीस कर्मचारी निलेश देवरे, सिराज खाटीक, राकेश मोरे, धिरज सांगळे आणि इंद्रजित वैराट यांनी केली.धुळे शहरातील महामार्ग क्रमांक ३ वरील लकबँक हॉटेलसमोरून चोरीस गेलेली मोटारसायकल अवघ्या काही दिवसांत शोधून काढत चाळीसगाव रोड पोलिसांनी चोरीचा गुन्हा उघडकीस आणला आहे. या प्रकरणी एका आरोपीला अटक करण्यात आली असून त्याच्याकडून सुमारे ३० हजार रुपये किमतीची मोटारसायकल जप्त करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी मजीद मुसा शाह यांनी त्यांची होंडा युनिकॉर्न मोटारसायकल ३० जुलैच्या मध्यरात्री ते ३१ जुलैच्या पहाटे दरम्यान अज्ञात चोरट्याने चोरून नेल्याची तक्रार दाखल केली होती. तपासादरम्यान ७ ऑगस्ट २०२६ रोजी प्रभारी अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक विवेक पवार यांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी शंभर फुटी रोडवरील डी-मार्ट परिसरात सापळा रचून नूर मोहम्मद इस्तेयाक अहमद अन्सारी (रा. रमजानपुरा, मालेगाव, जि. नाशिक) याला ताब्यात घेतले.

# विमानतळ प्राधिकरणाच्या बैठकीत मोठा निर्णय

## मंत्री गुलाबराव पाटील यांच्या मध्यस्थीने शेतकऱ्यांना दिलासा

जन सम्राट टाईम्स

**जळगाव|प्रतिनिधी :** विमानतळ प्राधिकरणाच्या प्रस्तावित कामांमुळे बंद होण्याची शक्यता असलेल्या नशिराबाद-उमाळा या महत्त्वाच्या मार्गाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत मोठा निर्णय घेण्यात आला. मंत्री गुलाबराव पाटील यांच्या मध्यस्थीने आणि नशिराबाद नगरपरिषदेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर हा रस्ता वाहतुकीसाठी कायम सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे परिसरातील शेतकरी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांसाठी अत्यावश्यक मार्ग नशिराबाद परिसरातील शेतकऱ्यांसाठी हा मार्ग दैनंदिन शेतीकामाचा मुख्य दुवा मानला जातो. ट्रॅक्टर, बैलगाड्या, शेतीची अवजारे तसेच शेतमालाची वाहतूक याच मार्गाने मोठ्या प्रमाणावर केली जाते. रस्ता बंद झाल्यास शेतकऱ्यांना लांबच्या पर्यायी मार्गाचा वापर करावा लागला असता, ज्यामुळे वेळ, श्रम आणि आर्थिक खर्च वाढण्याची शक्यता होती. ही बाब लक्षात घेऊन नशिराबाद नगरपरिषदेने जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजित करण्याची मागणी केली होती. बैठकीत शेतकऱ्यांची बाजू ठामपणे मांडली बैठकीत नगराध्यक्ष योगेश नारायण पाटील, उपनगराध्यक्ष पंकज महाजन तसेच माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष व नगरसेवक लालचंद पाटील यांनी हा रस्ता शेतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगत तो कोणत्याही परिस्थितीत बंद करू नये, अशी भूमिका मांडली. यानंतर मंत्री गुलाबराव पाटील यांनी जिल्हाधिकारी रोहन घुगे आणि संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून तोडगा काढला. चर्चेनंतर रस्ता सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. नशिराबाद-चिंचोली-उमाळा रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात दरम्यान, नशिराबाद-चिंचोली-



उमाळा रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात असून या मार्गामुळे परिसरातील दळणवळण अधिक सुलभ होणार आहे. नशिराबादच्या विकासासाठी केलेल्या योगदानाबद्दल नगरपरिषदेच्या वतीने मंत्री गुलाबराव पाटील यांचा सत्कारही करण्यात आला. बैठकीस मान्यवरांची उपस्थिती या बैठकीस मंत्री गुलाबराव पाटील, आमदार चंद्रकांत दादा सोनवणे, जिल्हाधिकारी रोहन घुगे, नगराध्यक्ष योगेश नारायण पाटील, उपनगराध्यक्ष पंकज महाजन, माजी जिल्हा परिषद सदस्य लालचंद पाटील, सभापती विकास पाटील, कीर्तिकांत चौबे, चेतन बऱ्हाटे, मनोज पाटील, नगरसेविका शैला व्यवहारे, नगरसेवक अस्लम सर, इक्बाल शेख, सलीम शहा, प्रदीप बोढरे, संदीप पाटील, समाजसेवक विकास धनगर, फिरदोस यांच्यासह विमानतळ प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि अन्य संबंधित विभागांचे अधिकारी तसेच परिसरातील शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांमध्ये समाधान रस्ता कायम सुरू ठेवण्याच्या निर्णयामुळे शेतीसाठीची वाहतूक सुरळीत राहणार असल्याने परिसरातील शेतकरी आणि नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

विमानतळ प्राधिकरणाच्या प्रस्तावित कामांमुळे बंद होण्याची शक्यता असलेल्या नशिराबाद-उमाळा या महत्त्वाच्या मार्गाबाबत जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या बैठकीत मोठा निर्णय घेण्यात आला. मंत्री गुलाबराव पाटील यांच्या मध्यस्थीने आणि नशिराबाद नगरपरिषदेच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यानंतर हा रस्ता वाहतुकीसाठी कायम सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे परिसरातील शेतकरी आणि नागरिकांना मोठा दिलासा मिळाला आहे. शेतकऱ्यांसाठी अत्यावश्यक मार्ग नशिराबाद परिसरातील शेतकऱ्यांसाठी हा मार्ग दैनंदिन शेतीकामाचा मुख्य दुवा मानला जातो. ट्रॅक्टर, बैलगाड्या, शेतीची अवजारे तसेच शेतमालाची वाहतूक याच मार्गाने मोठ्या प्रमाणावर केली जाते. रस्ता बंद झाल्यास शेतकऱ्यांना लांबच्या पर्यायी मार्गाचा वापर करावा लागला असता, ज्यामुळे वेळ, श्रम आणि आर्थिक खर्च वाढण्याची शक्यता होती. ही बाब लक्षात घेऊन नशिराबाद नगरपरिषदेने जिल्हाधिकारी कार्यालयात बैठक आयोजित करण्याची मागणी केली होती. बैठकीत शेतकऱ्यांची बाजू ठामपणे मांडली बैठकीत नगराध्यक्ष योगेश नारायण पाटील, उपनगराध्यक्ष पंकज महाजन तसेच माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष व नगरसेवक लालचंद पाटील यांनी हा रस्ता शेतीच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असल्याचे सांगत तो कोणत्याही परिस्थितीत बंद करू नये, अशी भूमिका मांडली. यानंतर मंत्री गुलाबराव पाटील यांनी जिल्हाधिकारी रोहन घुगे आणि संबंधित अधिकाऱ्यांशी चर्चा करून तोडगा काढला. चर्चेनंतर रस्ता सुरू ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. नशिराबाद-चिंचोली-उमाळा रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात दरम्यान, नशिराबाद-चिंचोली-उमाळा रस्त्याचे काम अंतिम टप्प्यात असून या मार्गामुळे परिसरातील दळणवळण अधिक सुलभ होणार आहे.

# जि.प. शिक्षक संवर्गातील पदोन्नती प्रक्रियेला तात्पुरती स्थगिती!

जन सम्राट टाईम्स

**पारोळा | प्रतिनिधी:** जिल्हा परिषद शिक्षक संवर्गातील विविध पदांच्या पदोन्नती प्रक्रियेला मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने अंतरिम स्थगिती दिली असून, त्यामुळे राज्यभरातील पदोन्नती प्रक्रिया तात्पुरती थांबविण्यात आली आहे. या निर्णयामुळे शिक्षकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली असून, आता न्यायालयाच्या पुढील सुनावणी आणि शासनाच्या निर्णयाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. शालेय शिक्षण विभागाने दि. २९ जुलै २०२६ रोजी शिक्षक संवर्गातील विविध पदांवरील पदोन्नतीसाठी कार्यपद्धती निश्चित करणारा शासन निर्णय जारी केला होता. त्यानंतर प्राथमिक शिक्षण संचालनालय, पुणे यांनी दि. ३० जुलै २०२६ रोजी सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना त्यानुसार कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या होत्या. दरम्यान, या कार्यपद्धतीला आव्हान देत काही शिक्षकांनी मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठात रिट याचिका क्र. ४९८३/२०२६ दाखल केली. या याचिकेवरील सुनावणीदरम्यान न्यायालयाने शासन निर्णयातील खंड ४(३) च्या अंमलबजावणीस अंतरिम स्थगिती दिली. यानंतर दि. ५ ऑगस्ट २०२६ रोजी प्राथमिक शिक्षण संचालनालयाने सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना अधिकृत पत्र पाठवून न्यायालयाच्या आदेशाची माहिती दिली. त्यानुसार, शिक्षक संवर्गातील पदोन्नतीसंदर्भातील सर्व प्रशासकीय कार्यवाही शासनाच्या पुढील आदेशापर्यंत स्थगित ठेवण्यात आली आहे. न्यायालयीन प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर आणि शासनाकडून नवीन आदेश जारी झाल्यानंतर पुढील कार्यवाही निश्चित होणार आहे. महत्त्वाचे मुद्दे जि.प. शिक्षक पदोन्नती प्रक्रियेला तात्पुरती स्थगिती. मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाचा अंतरिम आदेश. शासन निर्णयातील खंड ४(३) च्या अंमलबजावणीवर स्थगिती. पुढील आदेशापर्यंत सर्व प्रशासकीय कार्यवाही थांबणार. अंतिम निर्णय न्यायालयीन सुनावणीनंतर अपेक्षित.

जन सम्राट टाईम्स ब्रेक न्यूज ज

# दहिगाव ग्रामपंचायत लिपिक रवींद्र निलंबित

## कर्जप्रकरणाला मदत केल्याचा आरोप



जन सम्राट टाईम्स

**यावल | प्रतिनिधी :** यावल तालुक्यातील दहिगाव ग्रामपंचायत कार्यालयातील लिपिक रवींद्र शिवाजी पाटील यांना घराच्या उताऱ्यात कथित बेकायदेशीर फेरफार केल्याच्या आरोपावरून ग्रामपंचायतीने निलंबित केले आहे. ग्रामपंचायतीच्या मासिक बैठकीत सर्वानुमते ठराव मंजूर करून ही कारवाई करण्यात आली.घराच्या उताऱ्यात फेरफार केल्याचा आरोप तक्रारदार हेमराज प्रभाकर पाटील यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या घराच्या उताऱ्यावरून त्यांचे नाव कमी करण्यात आले. त्यानंतर त्यांचे दिवंगत भाऊ दिगंबर प्रभाकर पाटील यांच्या नावाने नवीन उतारा देण्यात आला. या उताऱ्याच्या आधारे महिंद्रा फायनान्स कंपनीकडून सुमारे १.५० लाख रुपयांचे कर्ज मिळवून देण्यासाठी सहकार्य केल्याचा आरोप करण्यात आला आहे. विशेष म्हणजे, अवघ्या १५ दिवसांच्या कालावधीत दोन वेगवेगळे घराचे उतारे जारी करण्यात आल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

तक्रारीनंतर कारवाई या प्रकरणी हेमराज पाटील यांनी पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी मंजुश्री गायकवाड यांच्याकडे तक्रार दाखल केली होती. गटविकास अधिकाऱ्यांनी हा विषय स्थानिक स्तरावर ग्रामपंचायतीने निर्णय घेण्याच्या अधिकारातील असल्याचे स्पष्ट केल्यानंतर ग्रामपंचायतीने यावर कार्यवाही सुरू केली. सर्वानुमते निलंबनाचा ठराव दि. ६ ऑगस्ट रोजी झालेल्या ग्रामपंचायतीच्या मासिक बैठकीत या प्रकरणावर सविस्तर चर्चा करण्यात आली. त्यानंतर सर्व सदस्यांच्या एकमताने लिपिक रवींद्र पाटील यांच्या निलंबनाचा ठराव मंजूर करण्यात आला. या बैठकीस ग्रामविकास अधिकारी बोदडे, सरपंच, उपसरपंच तसेच सर्व ग्रामपंचायत सदस्य उपस्थित होते.यावल तालुक्यातील दहिगाव ग्रामपंचायत कार्यालयातील लिपिक रवींद्र शिवाजी पाटील यांना घराच्या उताऱ्यात कथित बेकायदेशीर फेरफार केल्याच्या आरोपावरून ग्रामपंचायतीने निलंबित केले आहे. ग्रामपंचायतीच्या मासिक बैठकीत सर्वानुमते ठराव मंजूर करून ही कारवाई करण्यात आली.घराच्या उताऱ्यात फेरफार केल्याचा आरोप तक्रारदार हेमराज प्रभाकर पाटील यांच्या म्हणण्यानुसार, त्यांच्या घराच्या उताऱ्यावरून त्यांचे नाव कमी करण्यात आले.

# अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधातजळगावातमहामोर्चाचीतयारी

## ५९ जातींचा महामेळावा उपवर्गीकरणाविरोधी संघर्ष समितीचे आवाहन

जन सम्राट टाईम्स

**जळगाव| प्रतिनिधी:** अनुसूचित जाती (SC) आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या प्रस्तावित प्रक्रियेविरोधात जळगावात भव्य महामोर्चा आयोजित करण्याच्या तयारीला वेग आला आहे. या महामोर्चाच्या नियोजनासाठी शनिवार, ८ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २ वाजता प्रभात कॉलनी स्टॉप येथील शानबाग सभागृहात ५९ जातींच्या प्रतिनिधींचा महामेळावा आयोजित करण्यात आला आहे. अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी संघर्ष समितीच्या वतीने आयोजित या मेळाव्यात महामोर्चाची रूपरेषा, नियोजन आणि पुढील आंदोलनाची दिशा निश्चित करण्यात येणार आहे.

या बैठकीला ५९ जातींच्या प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महामोर्चा यशस्वी करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. उपवर्गीकरणाविरोधातील प्रमुख भूमिका संघर्ष समितीच्या मते, अनुसूचित जातींचे उपवर्गीकरण केल्यास



संविधानातील समतेच्या तत्त्वावर परिणाम होण्याची शक्यता असून, अनुसूचित जाती समाजातील सामाजिक ऐक्याला धक्का बसू शकतो. समितीने स्पष्ट केले की, हा मोर्चा कोणत्याही एका समाजाविरोधात नसून, मातंग समाजासह सर्व ५९ जातींचे ऐक्य अबाधित ठेवणे हा या आंदोलनाचा प्रमुख उद्देश आहे. संघर्ष समितीने मांडलेले मुद्दे अनुसूचित जातींमध्ये सामाजिक तेढ व मतभेद निर्माण होण्याची भीती. आरक्षणाचा मूळ हेतू आणि अनुसूचित जातींचे एकसंध स्वरूप बाधित होण्याची शक्यता.

उपवर्गीकरणामागे राजकीय हेतू असल्याचा आरोप. जातीनिहाय अधिकृत व विश्वासार्ह आकडेवारी उपलब्ध नसताना निर्णय घेणे अन्यायकारक असल्याचा दावा. केवळ उपवर्गीकरणाऐवजी शिक्षण, रोजगार आणि प्रशासकीय बळकटीकरणावर भर देण्याची गरज. संघर्ष समितीने शासनाने या मुद्द्यांची गांभीर्याने दखल घ्यावी आणि प्रस्तावित उपवर्गीकरणाचा पुनर्विचार करावा, अशी मागणी केली आहे. मोठ्या सहभागाचे आवाहन अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधी संघर्ष समितीचे निमंत्रक मुकुंद भाऊ सपकाळे आणि राष्ट्रीय चर्मकार संघटनेचे राष्ट्रीय कार्याध्यक्ष भानुदास विसावे यांनी ५९ जातींच्या प्रतिनिधींनी मोठ्या संख्येने महामेळाव्यास उपस्थित राहून आगामी महामोर्चा यशस्वी करण्यासाठी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन केले आहे. अनुसूचित जाती (SC) आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या प्रस्तावित प्रक्रियेविरोधात जळगावात भव्य महामोर्चा आयोजित करण्याच्या तयारीला वेग आला आहे.

# तालुका आरोग्य विभागाचा जनजागृती उपक्रम

## बालकवी ठोंबरे विद्यालयात हत्तीरोग प्रतिबंधाबाबत मार्गदर्शन

जन सम्राट टाईम्स

**धरणगाव| प्रतिनिधी :** हत्तीरोगमुक्त धरणगाव घडविण्याच्या उद्देशाने तालुका आरोग्य विभागाच्या वतीने धरणगाव येथील बालकवी ठोंबरे विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी हत्तीरोग (फायलेरियासिस) प्रतिबंध आणि जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना हत्तीरोगाची माहिती, त्याची कारणे, लक्षणे आणि प्रतिबंधात्मक उपायांविषयी सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय चव्हाण आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. दीपक साळुंखे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या कार्यक्रमात वैद्यकीय अधिकारी डॉ. शुभम जाधव, आरोग्य सहाय्यक आधार भोई आणि एमपीडब्ल्यू पी. एस. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना हत्तीरोगाचा प्रसार, डासांपासून बचावाचे उपाय तसेच शासनाच्या मास ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन (MDA) मोहिमेअंतर्गत वितरित करण्यात येणाऱ्या प्रतिबंधक गोळ्या नियमितपणे घेण्याचे महत्त्व समजावून सांगितले.



यावेळी रात्री मच्छरदाणीचा वापर, परिसरात पाणी साचू न देणे, वैयक्तिक स्वच्छता राखणे आणि स्वच्छ परिसर ठेवणे याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमास एमपीडब्ल्यू मयूर पाटील, शाळेचे मुख्याध्यापक एस. एस. पाटील, शिक्षकवृंद तसेच विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

शेवटी विद्यार्थ्यांनी "हत्तीरोगमुक्त परिसर, स्वच्छ परिसर" हा संकल्प करून आपल्या कुटुंबात आणि समाजात स्वच्छता व आरोग्यदायी सवयी रुजविण्याचा निर्धार व्यक्त केला.हत्तीरोगमुक्त धरणगाव घडविण्याच्या उद्देशाने तालुका आरोग्य विभागाच्या वतीने धरणगाव येथील बालकवी ठोंबरे विद्यालयात विद्यार्थ्यांसाठी हत्तीरोग (फायलेरियासिस) प्रतिबंध आणि जनजागृती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. संजय चव्हाण आणि वैद्यकीय अधीक्षक डॉ. दीपक साळुंखे यांच्या डॉ. शुभम जाधव, आरोग्य सहाय्यक आधार भोई आणि एमपीडब्ल्यू पी. एस. गायकवाड यांनी विद्यार्थ्यांना हत्तीरोगाचा प्रसार, डासांपासून बचावाचे उपाय तसेच शासनाच्या मास ड्रग ॲडमिनिस्ट्रेशन (MDA) मोहिमेअंतर्गत वितरित करण्यात येणाऱ्या प्रतिबंधक गोळ्या नियमितपणे घेण्याचे महत्त्व समजावून सांगितले. स्वच्छ परिसर ठेवणे याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

# जिवंत बांधकाम कामगारांना 'मृत' दाखवून २३.४० लाखांचा घोटाळा; १० जणांविरुद्ध गुन्हा

## बनावट मृत्यू दाखल्यांच्या आधारे शासनाची फसवणूक; बनावट कागदपत्रे तयार करणाऱ्यांचा पोलिसांकडून शोध

जन सम्राट टाईम्स

**पारोळा । प्रतिनिधी:** परभणी जिल्ह्यातील पूर्णा तालुक्यातील धानोरा मोत्या व गौर गावांमध्ये जिवंत बांधकाम कामगारांना कागदोपत्री मृत दाखवून शासनाच्या विविध योजनांतील २३ लाख ४० हजार रुपयांचा अपहार झाल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणी १० जणांसह बनावट कागदपत्रे तयार करणाऱ्यांविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे. बनावट मृत्यू दाखल्यांद्वारे लाखोंची फसवणूक प्राथमिक तपासात जिवंत नोंदणीकृत बांधकाम कामगारांचे बनावट मृत्यू दाखले तयार करण्यात आल्याचे समोर आले आहे. त्याआधारे खोटे वारसदार दाखवून शासकीय योजनांमधील लाभ उचलण्यात आला. प्रत्येक प्रकरणात सुमारे २ लाख ३४ हजार रुपये मंजूर करण्यात आले. त्यामध्ये – नैसर्गिक मृत्यू लाभ – २ लाख रुपये वारस/विधवा पेन्शन – २४ हजार रुपये अंत्यसंस्कार सहाय्य – १० हजार रुपये अशा १० प्रकरणांमध्ये एकूण २३ लाख ४० हजार रुपयांची शासनाची फसवणूक झाल्याचे उघड झाले आहे. ग्रामसेवकांच्या अहवालातून बनावटपणा उघड या प्रकरणाची चौकशी करताना संबंधित ग्रामसेवकांना नोटिसा बजावण्यात आल्या. त्यांच्या अहवालात संबंधित मृत्यू प्रमाणपत्रे बनावट असल्याचे स्पष्ट करण्यात आले. प्राथमिक चौकशीतही मृत्यू दाखले बोगस असल्याचे निष्पन्न झाले आहे. एकाने रक्कम परत केली, इतरांविरुद्ध गुन्हा फसवणुकीची रक्कम परत करण्यासाठी संबंधितांना नोटिसा बजावण्यात आल्या. त्यानुसार लक्ष्मण बाबुराव टाक यांनी लाभाची रक्कम शासनाकडे परत जमा केली. मात्र, इतरांनी रक्कम न भरल्याने ४ ऑगस्ट रोजी १० जणांविरुद्ध कोतवाली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. या आरोपींचा समावेश या प्रकरणातील आरोपींमध्ये बालाजी रामजी पांचाळ, बालाजी भीमराव कदम, अण्णाराव धोंडीबा भालेराव, माणिक महादू डरांगे, मिराबाई देविदास पांचाळ, मुक्ताबाई नामदेव डाखोरे, दिगंबर व्यंकटी जोगदंड, मुरलीधर नारायण जोगदंड, ज्ञानोबा चुडामणी पारवे आणि सुमनबाई बालाजी पांचाळ यांचा समावेश असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. बनावट कागदपत्रे तयार करणाऱ्यांचा शोध या घोटाळ्यात बनावट मृत्यू दाखले आणि इतर कागदपत्रे तयार करण्यात कोणाचा सहभाग आहे, याचा पोलिसांकडून कसून तपास सुरू असून, या रॅकेटमागील सूत्रधारांचा शोध घेतला जात आहे.

# आभोडा येथे रावेर पोलिसांची धडक कारवाई

## ६०० किलो संशयित गोमांस व ३ जिवंत गोवंश जप्त, बेकायदेशीर गोवंश कत्तल व मांस विक्रीप्रकरणी गुन्हा

जन सम्राट टाईम्स

**रावेर | प्रतिनिधी:** रावेर तालुक्यातील आभोडा येथे बेकायदेशीर गोवंश कत्तल व मांस विक्री केल्याच्या संशयावरून रावेर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने धडक कारवाई करत सुमारे ६०० किलो संशयित गोमांस आणि ३ जिवंत गोवंश जप्त केले. या कारवाईत एका संशयिताला अटक करण्यात आली असून दुसरा संशयित फरार आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आभोडा गावातील बसस्थानक परिसरात गोवंशाची कत्तल करून मांस विक्री सुरू असल्याची गोपनीय माहिती गुन्हे शोध पथकाला मिळाली होती. त्यानुसार सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज



महाजन यांच्या पथकाने ७ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी एका घरावर छापा टाकला. छाप्यात उस्मान हसन कुरेशी (वय ४८, रा. आभोडा) हा घरात मांस कापताना आढळून आल्याचा पोलिसांचा दावा आहे. त्याला ताब्यात घेऊन सुमारे ३०० किलो संशयित गोमांस, कुऱ्हाड आणि सुरे जप्त करण्यात आले. यानंतर चावडी परिसरात आणखी एका ठिकाणी छापा टाकण्यात आला. पोलिसांची चाहूल लागताच इरफान रहेमान उर्फ लंगड्या कुरेशी (वय ३२, रा. आभोडा) हा पसार झाला.

त्याच्या घरातूनही सुमारे ३०० किलो संशयित गोमांस व काही हत्यारे जप्त करण्यात आली.

कारवाईदरम्यान चावडी व आठवडे बाजार परिसरात कत्तलीच्या उद्देशाने बांधून ठेवल्याचा संशय असलेल्या तीन जिवंत गायीही पोलिसांना आढळून आल्या. त्यांना सुरक्षिततेसाठी गोशाळेत हलविण्यात आले. पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. रणजीत पाटील यांच्या उपस्थितीत जप्त केलेल्या मांसाचे नमुने तपासणीसाठी घेण्यात आले असून उर्वरित मांसाची नियमानुसार विल्हेवाट लावण्यात आली.

या प्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल विशाल पाटील यांच्या फिर्यादीवरून रावेर पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक ०३७६/२०२६ दाखल करण्यात आला आहे.रावेर तालुक्यातील आभोडा येथे बेकायदेशीर गोवंश कत्तल व मांस विक्री केल्याच्या संशयावरून रावेर पोलिसांच्या गुन्हे शोध पथकाने धडक कारवाई करत सुमारे ६०० किलो संशयित गोमांस आणि ३ जिवंत गोवंश जप्त केले. या कारवाईत एका संशयिताला अटक करण्यात आली असून दुसरा संशयित फरार आहे. महाराष्ट्र प्राणी सुधारणा अधिनियम, प्राण्यांचा छळ प्रतिबंधक अधिनियम तसेच भारतीय न्याय संहितेतील संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदविण्यात आला आहे.या कारवाईत उस्मान हसन कुरेशी याला अटक करण्यात आली असून फरार संशयित इरफान कुरेशी याचा शोध सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक श्रीकांत धिवरे, अपर पोलीस अधीक्षक संदीप गावित, उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल बडगुजर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप पाटील, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज महाजन आणि गुन्हे शोध पथकाने केली.

# वाहन चालक-मालकांना कल्याणकारी मंडळाचे सभासद होण्याचे आवाहन!

जन सम्राट टाईम्स

**पारोळा । प्रतिनिधी:** महाराष्ट्र शासनाने 'धर्मवीर आनंद दिघे महाराष्ट्र प्रवासी वाहतूक चालक-मालक कल्याणकारी मंडळ' अधिक व्यापक करत प्रवासी वाहतूक क्षेत्रातील चालक-मालकांच्या सामाजिक व आर्थिक सुरक्षेसाठी महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सुधारित निर्णयानुसार आता केवळ ऑटो रिक्षा परवानाधारक वाहन मालकांपुरती मर्यादित असलेली योजना बस, टुरिस्ट टॅक्सी आणि ऑटो चालक-मालकांनाही लागू करण्यात आली आहे. यापूर्वी या मंडळाचे सदस्यत्व फक्त ऑटो रिक्षा परवानाधारक वाहन मालकांनाच उपलब्ध होते. मात्र, शासनाच्या सुधारित निर्णयानुसार बस, टुरिस्ट टॅक्सी किंवा ऑटो प्रवासी वाहन चालविण्याचा वैध बॅज असलेले चालक-मालक आता या मंडळाचे सभासद होण्यासाठी अर्ज करू शकणार आहेत. मंडळामार्फत चालक-मालकांसाठी विविध कल्याणकारी योजना राबविण्यात येणार असून त्यामध्ये ६५ वर्षांवरील चालकांसाठी सन्मान निधी, कर्तव्यावर असताना जीवन विमा व अपंगत्व विमा संरक्षण, आरोग्यविषयक लाभ, कौशल्यवृद्धी प्रशिक्षण, कर्तव्यावर दुखापत झाल्यास आर्थिक सहाय्य तसेच चालकांच्या पाल्यांसाठी शिष्यवृत्ती योजना यांचा समावेश आहे. या योजनांचा लाभ जास्तीत जास्त पात्र चालक-मालकांना मिळावा यासाठी बस, टुरिस्ट टॅक्सी आणि ऑटो चालक-मालकांनी कल्याणकारी मंडळाचे सभासदत्व घेऊन शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन उपप्रादेशिक परिवहन कार्यालय, बुलढाणा यांनी केले आहे